Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

ऑक्टोबर - २०२५ | दहावा अंक

# पोलिओ दिन विशेषांक





**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary

## Guest Editor Rtn.Dilip Soni



प्रिय रोटेरियन बांधवांनो,

''सेवा सर्वोपरि'' या तत्त्वावर चालणाऱ्या रोटरीच्या कार्यात अनेक मानवी कल्याणाच्या दिशा आहेत, त्यापैकी सर्वात ऐतिहासिक आणि अभि'ानास्पद कार्य म्हणजे ''पोलिओ निर्मूलन मोहिम''. जगभरात लाखो मुलांना आरोग्यदायी जीवनाची हमी देणाऱ्या या मोहिमेचा आपण सर्व रोटेरियन एक अभिन्न भाग आहोत, ही अत्यंत अभि'ानाची गोष्ट आहे.कधी काळी पोलिओ हा आजार जगातील कोट्यवधी बालकांच्या आयुष्यात अपंगत्व, दुःख आणि निराशा निर्माण करणारा भयंकर आजार होता. पण रोटरी इंटरनॅशनलने १९८५ साली ''पोलिओप्लस ()'' ही ऐतिहासिक मोहीम सुरु केली आणि त्या दिवसापासून या आजाराला पृथ्वीवरुन हद्दपार करण्याचा जागतिक संकल्प सुरु झाला. आज या मोहिमेमुळे जगातील ९९% पेक्षा अधिक देश पोलिओमुक्त झाले आहेत, आणि भारताने २०१४ साली अधिकृतपणे ''पोलिओमुक्त देश'' असा दर्जा मिळवला  हे रोटरीच्या सातत्यपूर्ण, निःस्वार्थ प्रयत्नांचे फळ आहे.ही मोहीम केवळ लसीकरणापुरती मर्यादित नव्हती; ती होती जागरुकतेची, सहकार्याची आणि न थांबणाऱ्या सेवाभावाची कहाणी. हजारो स्वयंसेवक, डॉक्टर, आरोग्य क'चारी आणि रोटेरियन यांनी एकत्र येऊन ''दरवाजे ते दरवाजे'' मोहीम राबवली. प्रत्येक गाव, प्रत्येक वस्तीतून रोटरीच्या ''दोन थेंब जीवनाचे'' या संदेशाने परिवर्तन घडवले.रोटरीने दाखवून दिले की, सामूहिक इच्छाशक्ती आणि दृढ संकल्प असला तर जग बदलवणे शक्य आहे. पोलिओ निर्मूलन हे केवळ आरोग्य अभियान नव्हे, तर मानवतेच्या विजयाची गाथा आहे.आजही रोटरी या यशावर समाधानी न राहता सतत ''पोलिओ फ्री वर्ल्ड'' राखण्यासाठी कार्यरत आहे. कारण एखाद्या देशात पुन्हा पोलिओचा विषाणू आढळू नये, यासाठी सतत दक्षता, जनजागृती आणि लसीकरणाची साखळी अबाधित ठेवणे अत्यावश्यक आहे.या विशेषांकातून आपण केवळ या ऐतिहासिक मोहिमेचे स्मरण करीत नाही, तर भावी पिढ्यांप्रती जबाबदारीची जाणीवही पुन्हा दृढ करीत आहोत. ''पोलिओचा पूर्ण अंत'' हा आपला केवळ वैद्यकीय नव्हे, तर मानवी मूल्यांवर आधारित संकल्प आहे.अतिथी संपादक म्हणून 'ला ही जबाबदारी दिल्याबद्दल मी रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटाऊन व संपादक मंडळाचे मनःपूर्वक आभार मानतो. चला, आपण सर्व मिळून या यशाचा अभिमान बाळगूया आणि पुढील पिढीला आरोग्यदायी, पोलिओमुक्त जग देण्याचा आपला संकल्प अधिक दृढ करूया.

रो.दिलीप सोनी  
अतिथी संपादक, रोटरी दिशा

## Secretary Report

- मिटींग ची सुरुवात राष्ट्रगीताने झाली
- फोरवे टेस्ट चे सामुहीक वाचन झाले.
- साप्ताहिक पत्रव्यवहार अध्यक्षांनी सभागृहास सांगितले
- सर्व सभासद, अन्य व अतिथींचे स्वागत शब्द सुमनांनी केले.
- सर्व ॲन्सचे स्वागत पेन देऊन करण्यात आले.
- दृष्टी झोनल सेमीनार पब्लिक इमेज व युथ सर्विस या बद्दल ची माहिती अध्यक्ष रो. अमोल दाडगे यांनी दिली
- पुरग्रस्तांना किटचे वाटपा संबंधी कॉप कडुन राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती अध्यक्षांनी सांगितले .
- अतिथी डॉ. जयद्रथ जाधव यांचे स्वागत एजी रविंद्र हिंगणे यांनी केले
- रोटरी रन : या उपक्रमाचे माहिती अध्यक्षांनी दिली व अधिकाधिक सदस्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन केले.
- गरजु लोकांसाठी जुने कपडे संकलन :  अंदाजे २ पोते कपडे संकलन झाले व ते गरिबांना वाटप करणार असल्याचे अध्यक्षांनी सांगितले.
- क्लब बुलेटिन : चेअरमन अमोल बनाळे यांनी माहिती दिली व साप्ताहिक बुलेटिन चे विमोचन अतिथी, डिजी सुधीर लातूरे , एजी रवि हिंगणे , अध्यक्ष व सचिव व अतिथी संपादक विकास बारूळे यांच्या हस्ते झाले
- अंकाचे जाहिरातदार व व अतिथी संपादक विकास बारूळे यांचे पेन देऊन स्वागत करण्यात आले.
- ज्योती पवार यांनी बेसबॉल चॅम्पियनशिप परदेश दौऱ्यासाठी अर्थिक मदतीसाठी आवाहन केले.
- अतिथी डॉ. जयद्रथ जाधव यांचा परिचय प्रेसीडेंट इलेक्ट रमेश चिल्ले यांनी करून दिला.
- अतिथी डॉ. जयद्रथ जाधव अभिजात मराठी भाषा व त्यांचे महत्त्व या विषयावर सखोल माहिती सांगितली.
- विजयकुमार बिराजदार यांनी अतिथी डॉ. जयद्रथ जाधव यांचे मोमेन्टो देऊन स्वागत केले.
- रो. सचिन मालु यांनी अतिथी डॉ. जयद्रथ जाधव यांचे आभार मानले. विजयकु'ार बिराजदार
- फेलोशिप अनाउन्मेंट श्रध्दानंद अपशेट्टी यांनी केली यांनी केली.

| Guest of The Meeting | Man of The Meeting | 1st Come in the Hall |
|---|---|---|
|  |  |  |
| Dr.Jaidrath Jadhav | Rtn.Dr.Kiran Dande | Rtn.Dr.Vijaykumar Birajdar |

# पोलिओ निर्मूलनात रोटरीचे योगदान

**पोलिओ निर्मूलनात रोटरीचे योगदान - मानवतेसाठी एक जागतिक चमत्कार**

रोटरी इंटरनॅशनलचे नाव घेताच मनात ''सेवा सर्वोपरि'' हा विचार उमटतो. समाजातील दुःख, अंधःकार आणि अन्यायाविरुद्ध लढा देणारी ही संस्था नेहमीच मानवतेच्या बाजूने उभी राहिली आहे. पण रोटरीच्या इतिहासातील सर्वात मोठे, प्रभावी आणि जागतिक स्तरावर मान्य झालेले कार्य म्हणजे ''पोलिओ निर्मूलन मोहीम'' एक आजार पूर्णपणे संपवण्याचा मानवी इतिहासातील अभूतपूर्व प्रयत्न.

पोलिओ एक भयंकर वास्तव - कधी काळी पोलिओ (पक्षाघात) हा आजार जगभरात भीतीचं कारण होता. हा विषाणू लहान मुलांना कायमस्वरूपी अपंगत्व देत असे, आणि अनेकदा त्यांचा संपूर्ण जीवनप्रवाह बदलत असे. जगभरात दरवर्षी लाखो मुलं या आजाराने पीडित होत होती. विशेषतः विकसनशील देशांमध्ये ही समस्या अधिक तीव्र होती.

रोटरीचा ऐतिहासिक संकल्प१९८५ साली रोटरी इंटरनॅशनलने जगभरातील सदस्यांना एक आवाहन केले ''चलो, पोलिओमुक्त जग निर्माण करूया!''या संकल्पातूनच जन्माला आली ''पोलिओप्लस '' ही जागतिक मोहीम.रोटरीने या उपक्रमासाठी सर्वप्रथ' निधी, नियोजन आणि जनजागृती यांचा पाया रचला. रोटेरियन स्वतः गावोगावी, वस्त्यावस्त्यांत जाऊन लसीकरण मोहिमा राबवू लागले.यानंतर जागतिक आरोग्य संघटना , युनिसेफ , अमेरिकन आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशन यांनीही या मोहिमेत सहभाग घेतला. एकत्र येऊन तयार झाला, ज्याचा रोटरी हा मुख्य संस्थापक भागीदार आहे. लसीकरणाची क्रांती - रोटरीच्या प्रयत्नांनी जगभरात ''दोन थेंब जीवनाचे'' हा संदेश सर्वत्र पोहोचवला. लाखो स्वयंसेवक, डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि रोटेरियन यांचा सहभाग या यशात मोलाचा ठरला.भारतात १९९५ पासून 'ठ्या प्रमाणावर पल्स पोलिओ मोहीम सुरु झाली. रोटरी क्लब्सनी गावागावात लसीकरण केंद्रे उभी केली,मोहीमेत लस वितरण, जनजागृती मोहीमा, बॅनर-फ्लेक्स, शिबिरे आणि स्वयंसेवक प्रशिक्षण घेतले.''प्रत्येक मुलापर्यंत पोहोचू'' हा निर्धार घेऊन हजारो रोटेरियन प्रत्यक्ष क्षेत्रात उतरले.

पोलिओमुक्त भारत रोटरीचा अभिमान - या अविरत प्रयत्नांचे फळ २०१४ साली मिळाले,जेव्हा जागतिक आरोग्य संघटनेने भारताला ''पोलिओमुक्त देश'' म्हणून घोषित केले.हा केवळ भारताचा नाही, तर प्रत्येक रोटेरियनचा सेवाभावाचा विजय होता.आज जगातील १२५ पेक्षा जास्त देश पोलिओमुक्त झाले आहेत. फक्त काही मोजके देश (अफगाणिस्तान व पाकिस्तान) अजूनही या लढाईत आहेत, पण रोटरीचे प्रयत्न तेथेही अखंड सुरू आहेत. रोटरीची सततची भूमिकारोटरी फक्त पोलिओचा अंत घडवण्यातच नव्हे, तर पोलिओमुक्त जग टिकवण्यातही कार्यरत आहे.रोटरीचे सदस्य सतत लसीकरण मोहिमांमध्ये भाग घेतात, निधी संकलन करतात आणि नवीन पिढ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करतात. हा रोटरीचा ध्यास आजही तितकाच दृढ आहे. निष्कर्ष पोलिओ निर्मुलन हे केवळ आरोग्याचे यश नाही, तर मानवतेचा विजय आहे.रोटरीने दाखवून दिले की, जेव्हा संपूर्ण जग एकाच उद्दिष्टासाठी एकत्र येते, तेव्हा अशक्यही शक्य होते.आज प्रत्येक आरोग्यदायी, चालणारे, खेळणारे मूल हे रोटरीच्या सेवाभावाचे जिवंत उदाहरण आहे.आणि

म्हणूनच

''जिथे रोटरी आहे, तिथे आशा आहे;

जिथे आशा आहे, तिथे जीवन आहे.

## प्रकल्प - जुने कपडे संकलन व वाटप

**जुने कपडे वाटप उपक्रम**

पानचिंचोली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पालावरची शाळा व वसाहतीत साधारण १५० लाभार्थी उपस्थितीत जुन्या कपड्यांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमासाठी रो. अजय दुडीले, रो. प्रमोद कुंभार, अध्यक्ष रो. अमोल दाडगे आणि मी स्वतः उपस्थित होतो.कपडे जुने असूनही ते मिळवण्यासाठी महिलांची उत्सुकता आणि आनंद पाहण्यासारखा होता. तेथील लोकांकडून अत्यंत उत्साही प्रतिसाद मिळाला आणि त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद व स'ाधान हा या उपक्रमाचा सर्वात मोठा यश ठरला. रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउनच्या ''जुने कपडे संकलन व वाटप'' या उपक्रमाला समाजाकडून मिळालेला हा सकारात्मक प्रतिसाद खरोखरच प्रेरणादायी आहे.





# Rotary Mid Town this Week  Photo Gallery













रोटरी क्लब ऑफ बेंगलोरचे सदस्य रो.भास्कर व डी.जी.सुधीरजी लातूरेयांच्या समवेत मिड टाऊन रोटेरीयन्स

PESTEDGE EnviroCare's



PEST CONTROL SERVICES

Real Problem - Real Solution

For any assistance contact : 7517755567

**Neatedge Service Pvt Ltd**, HO: R-7/1431/A, 3rd Floor, Above Unik Super Market, Opp. Ratnadeep Talkies, Kawa Road, Latur - 413512, MH

+91 7517 75 5567 | 02382-250700 | pestedge.live@gmail.com | www.pestedge.in

NSIC Certified Company | MSME | ISO 9001:2015 Company | Member of Pest Management Association | Member of Indian Pest Control Association | Member of Pest Management Professionals Welfare Association | APMA | mms | EGAC Accredited | IAF

**Protecting Health, Securing Property, Preserving Environment**